| | |
|---|---|
| MHSN060009292024 | PWDVA Appln.No. 31/2024<br>Rupali Babaso Sakate Vs. Sachin Babaso Sakate |

## निशाणी ५ वरील आदेश

अर्जदार हिने सदरचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २३ प्रमाणे अंतरिम आदेश मिळणेकरिता दाखल केला आहे. सदर अर्जास जाबदार यांनी आपले म्हणणे निशाणी १३ प्रमाणे दाखल केले असून, सदरच्या अर्जास आक्षेप घेतला आहे.

२. अर्जदारतर्फे वकिल श्री. एस. एस. वाटवे आणि जाबदारतर्फे वकिल श्री. आय. बी. पालेगार यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार हिचा मूळ अर्ज, अंतरिम अर्ज, जाबदार यांचे म्हणणे व त्यातील कथने, अभिलेखावरील कागदपत्रे यांचे अवलोकन केले असता, खालील मुद्दे माझ्या विचाराधीन आले आहेत. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसासह मी नोंदवत आहे.

| अ. नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१ | अर्जदार ही तिच्यावर जाबदार यांनी कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य केले ही बाब प्रथमदर्शनी शाबीत करते काय ? | **होकारार्थी** |
| ०२ | अर्जदार ही तिच्या मागणी प्रमाणे अंतरीम पोटगी म्हणून मिळण्यास पात्र आहे काय? | **अंशत: होकारार्थी** |
| ०३ | अर्जदार ही तिच्या दोन मुलींसाठी शिक्षणाचा खर्च रक्कम रुपये १,००,०००/– प्रतिवर्षाप्रमाणे मिळण्यास पात्र आहे काय? | **अंशत: होकारार्थी** |
| ०४ | अर्जदार ही घरभाडे व लाईट पाणीसाठी रक्कम रुपये १०,०००/– मिळण्यास पात्र आहे काय? | **नकारार्थी** |
| ०५. | अर्जदार ही तिच्या मागणी प्रमाणे अंतरिम संरक्षणात्मक आदेश मिळणेस पात्र आहे का? | **नकारार्थी** |
| ०६. | आदेश काय? | **खालीलप्रमाणे** |

## <u>कारणमीमांसा</u>

**<u>मुद्दा क्र.०१ करिता</u> –**

३. यातील अर्जदार व जाबदार यांची परस्परविरोधी कथने पाहता, अर्जदार हिचा जाबदार नं. १ सोबत झालेला विवाह आणि अर्जदार व जाबदार यांचेदरम्यानचे नातेसंबंध वादातीत नाहीत. यातील अर्जदार हिने महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा कलम १२ प्रमाणे प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. महिलांचे कौटुंबिक हिंसाचार कायदाअन्वये कौटुंबिक हिंसाचार याची व्याख्या विषद केलेली असून, सदरच्या व्याख्यामध्ये शारिरीक हिंसाचार, लैंगिक हिंसाचार, शाब्दीक आणि भावनिक हिंसाचार आणि आर्थीक हिंसाचार यांचा समावेश केलेला असून, कौटुंबिक हिंसाचार या व्याख्येमध्ये हिंसाचाराचे व्याप्त स्वरुपात नमूद केलेले आहे. त्यामुळे वर नमूद केलेला प्रत्येक हिंसाचार हा कौंटुबिक हिंसाचार या व्याख्येखाली गणला जातो. यातील अर्जदार हिने जाबदार यांनी तिचेवर कौटुंबिक हिंसाचार केल्याचे मूळ अर्जामध्ये व अंतरिम अर्जामध्ये कथन केलेले आहे. सदर अंतरिम अर्जाच्या आदेशाच्या वेळी प्रथमदर्शनी कौटुंबिक हिंसाचार झाला आहे किंवा कसे हे पाहणे गरजेचे असते. सद्यपरिस्थीतीत अभिलेखावरील कथने कौटुंबिक हिंसाचार झाला ही बाब प्रथमदर्शनी शाबीत होण्याइतपत पुरेशी आहेत का इतके पाहणे गरजेचे ठरते. यातील अर्जदार आणि जाबदार यांनी आपल्या अर्जामध्ये आणि म्हणण्यामध्ये ब–याचशा घटनांचा उल्लेख केलेला आहे. त्यामुळे सद्यपरिस्थीतीत अभिलेखावरील असलेल्या कथनांचा विचार करुन प्रथमदर्शनी कौटुंबिक हिंसाचार झाला आहे किंवा कसे हे पाहणे गरजेचे आहे.

४. यातील अर्जदार हिने आपल्या अर्जामध्ये जाबदार यांनी लग्न ठरविताना नोकरी लावतो, दुकान काढून देतो असे आश्वासन दिले होते. परंतु त्यापैकी आजतागायत काहीएक करुन दिले नसल्याचे कथन केलेले आहे. तसेच जाबदार यांनी खोटी जन्मतारीख सांगून कुंडली जुळते असे सांगून फसवून लग्न केल्याचे कथन केलेले आहे. त्याचप्रमाणे जाबदार हे अर्जदार हिचेशी व तिच्या घरच्यांशी तुटकपणे बोलणे, सतत नावे ठेवणे, अर्जदार हिच्या घरच्यांशी संपर्क होऊ न देणे अशा प्रकारे वागणूक दिल्याचे कथन केलेले आहे. तसेच

अर्जदार हिच्या वडीलांकडून हक्काने फ्लॅट खरेदी करण्यासाठी पैसे मागून घेतल्याचे कथन केलेले आहे. त्याचप्रमाणे जाबदार नं. १ याची बहिण हिचादेखील अर्जदार हिच्या संसारामध्ये लुडबुड होती व जाबदार नं. १ हा तिच्या बहिणीचे ऐकून अर्जदार हिला त्रास देत असल्याचे कथन केलेले आहे. तसेच तिने पुढे कथन केलेले आहे की, अर्जदार हि पहिल्या मुलीच्या वेळी गरोदर असताना जाबदार यांनी तिला सतत काम लावून बोलून त्रास दिला. त्यानंतर अर्जदार हिला मुलगी झाल्यावर जाबदार यांनी मुलीचे कोणतेही लाड, हौस बारश्याच्यावेळी केली नाही.

५. अर्जदार हिने पुढे कथन केले आहे की, लग्नानंतर अर्जदार हिने एम.बी.ए. चे शिक्षण पूर्ण करणार असे म्हटल्यावर जाबदार यांनी अडवणूक केली तसेच सदरचे शिक्षण पूर्ण करतेवेळी अर्जदार हिला जाणीवपूर्वक त्रास दिल्याचे कथन केलेले आहे. त्याचप्रमाणे अर्जदार हि दुस–यांदा सन २०१७ साली गरोदर असताना जाबदार यांनी जबरदस्तीने दुस–या महिन्यात गर्भपाताच्या गोळया देण्यास भाग पाडले. त्यावेळी गर्भपात व्यवस्थीत न झाल्याने अर्जदार हिला उपचार घ्यावे लागले. तसेच पुढे कथन केले आहे की, मुलगा व्हावा याकरीता जाबदार यांनी अर्जदार हिला वेळोवेळी औषधे व उपचार घेण्यास भाग पाडले. त्यानंतर सन २०११ साली अर्जदार हिला मुलगी झाल्यावर जाबदार यांची निराशा झाली आणि ते सतत अर्जदार हिच्यावर चिडचिड करणे, तिला बोल लावणे असे प्रकार करु लागले. तसेच अर्जदार हिने जाबदार यास नोकरी करु देणेबाबत विनंती केली असता जाबदार नं. १ यांनी अर्जदार हिला मारहाण केली आणि मुलगाच पाहिजे असा सारखा हट्ट व बोलून तिच्यावर मानसिक दबाव आणला. तसेच पुढे कथन केलेले आहे की, सन २०२० मध्ये अर्जदार हिच्या वडीलांचे निधन झाले होते, त्यावेळी जाबदार यांनी अर्जदार हिला धीर न देता तिच्याशी भांडण काढले. तसेच त्या रागात जाबदार नं. १ याने अर्जदार हिला मारहाण करुन गळा दाबण्याचा प्रयत्न केला व तिला सोफयावरुन ढकलून दिले. त्यामुळे अर्जदार हिच्या कंबरेला मार लागला व तिला उपचार घ्यावे लागले होते. तसेच जाबदार नं. १ हे जास्तच हिसंक वृत्तीने वागण्यास सुरुवात करुन अर्जदार हिचा गळा दाबणे, तिच्या

अंगावर काठी, झाडू घेऊन मारायला धावणे, अर्वाच्च भाषा वापरुन वाद घालणे असे प्रकार करीत असल्याचे कथन केलेले आहे.

६. तसेच पुढे कथन केलेले आहे की, अर्जदार हिच्या आईचा माहेरकडील धर्म ख्रिश्चन आहे, परंतु अर्जदार या हिंदू आहेत. तरीही जाबदार हे अर्जदार हिला तिच्या आईच्या माहेरच्या धर्मावरुन बोलू लागले तसेच अर्जदार हि हिंदू धर्माचे प्रामाणिकपणे पालन करीत असून देखील तिला टोमणे मारणे, त्रास देणे असे प्रकार करीत होते. त्यानंतर पुढे कथन केलेले आहे की, एप्रिल २०२३ मध्ये अर्जदार हि माहेरी मुलीला घेऊन आली असता जाबदार यांनी तिच्याशी सर्व प्रकारचा संपर्क बंद केला व तिची व मुलीची कोणतीही विचारपूस केली नाही. तसेच जाबदार नं. १ याने अर्जदार हिच्या माहेरी येऊन मोठया मुलीला अर्जदार हिला कोणतीही कल्पना न देता घेऊन गेला. त्यानंतर अर्जदार ही मोठया मुलीच्या वाढदिवसानिमित्त पुण्याला आली असता त्यावेळी जाबदार नं. १ याने अर्जदार हिला एका कागदावर सह्या करणेस सांगितले. तसेच सदरच्या कागदावर सही केली तरच नांदविणेस तयार असल्याचे कथन केले आहे. त्यानंतर लहान मुलीच्या वाढदिवसानिमित्त मोठी मुलगी हिची मिरज येथे येण्याची इच्छा असताना देखील जाबदार यांनी त्यास हरकत घेतली. त्यानंतर मोठी मुलगी शामली हिला पुण्याला सोडण्यासाठी अर्जदार हि गेली असता जाबदार यांनी पुन्हा कागदावर सही करणेस जबरदस्ती केली. त्यानंतर जाबदार यांना मुलगी शामली हिचेसोबत फोनवर बोलू न देणे, फोन न उचलणे असे प्रकार सुरु केले. त्यानंतर अर्जदार ही मुलगी शामली हिला भेटण्यास गेली असता जाबदार यांनी तिच्याशी भांडण करुन व तिला मारहाण करुन घरातून बाहेर काढले. त्यानंतर अर्जदार ही मुलगी शामली हिला घेऊन पोलीस स्टेशनला गेली व त्याठिकाणी तक्रार दाखल करुन मिरज येथे आली. त्यानंतर अर्जदार ही मुलींसह आपल्या माहेरी राहत असून जाबदार यांनी अर्जदार व मुलींच्या उदरनिर्वाहाकरीता कोणतेही सोय अगर व्यवस्था केली नसल्याचे कथन केलेले आहे.

७. याउलट जाबदार यांनी अर्जदार हिच्या अर्जातील कथने आणि त्यातील नमूद

केलेल्या घटना स्पष्टपणे नाकारलेल्या आहेत. यातील जाबदार यांनी कथन केलेले आहे की, जाबदार नं. १ यांनी अर्जदार व मुलींना कधीही व केंव्हाही कशाची कमतरता भासू दिलेली नाही. तसेच जाबदार नं. १ याने अर्जदार हिला एम.बी.ए. करण्यास सांगितले तसेच तिला गायनाची आवड असल्याने त्याकरीता देखील क्लास लावून प्रोत्साहित केले होते. तसेच घरातील प्रत्येक निर्णयामध्ये अर्जदार हिचे मत जाणून घेऊन जाबदार नं. १ हा निर्णय घेत होता. त्याचप्रमाणे जाबदार नं. १ यांनी अर्जदार हिच्या इच्छेखातर सर्व सुखसुविधा घरामध्ये उपलब्ध करुन दिल्या होत्या तसेच अर्जदार हिला आनंदी ठेवण्याचा प्रयत्न केला होता. तसेच अर्जदार हिला वाढदिवसाला सणाला भेटवस्तू वेळोवेळी दिलेल्या आहेत. तसेच जाबदार नं. १ हा नोकरीवरुन घरी आल्यानंतर अर्जदार हिला घरी मदत करणे, मुलांचा अभ्यास घेणे ही सर्व कर्तव्ये पार पाडलेली आहेत.

८. तसेच पुढे कथन केलेले आहे की, अर्जदार ही हिंदू धर्माची मनापासून पालन करीत नसल्याचे तसेच हिंदू सण केवळ दिखाव्याकरीता करीत असल्याचे निर्दशनास आले. तसेच अर्जदार ही मुलांना देखील ख्रिश्चन धर्माची प्रार्थना व गाणी शिकवू लागली व तिने मनापासून ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केलेला असल्याने जाबदार नं. १ यांना प्रचंड मानसिक धकका बसला. त्याचप्रमाणे पुढे कथन केलेले आहे की, अर्जदार व तिची आई या संगनमताने जाबदार नं. १ यांना मानसिक त्रास देण्यासाठी कटकारस्थान रचून जाबदार यांच्या कुटुंबियाविषयी चुकीचे सांगून बदनामी करीत होत्या. अर्जदार हिला प्रथमपासून संसाराची आवड नसल्याने तिचे संसाराकडे व मुलांकडे पुर्णपणे दुर्लक्ष झाले होते. तसेच अर्जदार हिने काहीही घडलेले नसताना मुलांच्या शाळेत व सोसायटीमध्ये हिंदू धर्म वाद याबाबत सांगून बदनामी केली. तसेच जाबदार नं. १ यांना जीवे मारण्याचा कट केला. त्याचप्रमाणे पुढे कथन केले आहे की, यातील जाबदार यांनी अर्जदार हिच्यावर कोणताही दबाव टाकलेला नाही. तसेच तिच्याकडून कोणत्याही अपेक्षा ठेवल्या नाहीत. तसेच तिला मर्जीप्रमाणे वागण्याचे स्वातंत्र्य दिले होते. परंतु अर्जदार ही विनाकारण वाद करुन घरात अशांतता निर्माण करीत होती.

९. तसेच पुढे कथन केलेले आहे की, अर्जदार ही गरोदर असताना जाबदार यांनी तिची वेळोवेळी काळजी घेतलेली होती. तसेच तिच्या आवडीनिवडीनुसार खाण्यापिण्याची व्यवस्थीत काळजी घेऊन तिचे मनाप्रमाणे वागून जास्तीत जास्त आनंदी ठेवण्याचा प्रयत्न केला. पुढे त्यांनी कथन केलेले आहे की, एप्रिल २०२३ पासून कोणतेही कारण घडलेले नसताना अर्जदार ही माहेरी निघून गेलेली असून आजतागायत नांदणेस आलेली नाही. यातील जाबदार नं. १ याचे अर्जदार हिचेवर प्रेम असल्याने वेळोवेळी फोनद्वारे व प्रत्यक्ष भेटून नांदणेस येण्यासाठी विनंती केली. परंतु अर्जदार ही नांदणेस आलेली नाही. त्यानंतर जाबदार यांनी नोटीस पाठवून नांदणेस येणेबाबत कळवूनसुध्दा अर्जदार हि नांदणेस आलेली नाही. सबब जाबदार यांनी अर्जदार हिचा अर्ज नामंजूर करणेविषयी विनंती केली आहे.

१०. वर नमुद केल्याप्रमाणे सद्यपरिस्थीतीत केवळ प्रथमदर्शनी कौटुंबिक हिंसाचार झाला आहे का ? हे पाहणे गरजेचे ठरते. अर्जदार हिच्या एकंदरीत कथनावरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की, जाबदार यांनी लग्न झाल्यानंतर तुटकपणे बोलणे, सतत नावे ठेवणे अशा प्रकारची वागणूक दिल्याचे दिसून येते. तसेच अर्जदार शिक्षण पूर्ण करतेवेळी अर्जदार हिला जाणीवपूर्वक त्रास दिल्याचे व अर्जदार हिला लग्नानंतर नोकरी करु न दिल्याचे कथन केले आहे. त्याचप्रमाणे गरोदरपणावेळी, तसेच मुलीचा जन्म झाल्यावर देखील त्रास दिल्याचे कथन केले आहे. तसेच मुलगा व्हावा या कारणाकरीता उपचार घेणेस भाग पाडल्याचे व हट्ट धरल्याचे कथन केले आहे. तसेच जाबदार नं. १ याने गळा दाबण्याचा प्रयत्न, मारायला धावून येणे, अर्वाच्च भाषा वापरुन वाद घालणे असे प्रकार केले असल्याचे कथन केले आहे. जाबदार यांनी अर्जदार हिची कथने नाकारलेली असली तरी, अर्जदार हिच्या कथनावरुन जाबदार यांनी अर्जदार हिला शाब्दीक, मानसिक स्वरुपाचा त्रास देऊन कौटुंबिक हिसांचाराचे कृत्य केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. यातील जाबदार नं. १ याने अर्जदार आणि मुलींवर प्रेम असलेने त्यांच्या आवडी निवडीनुसार खाण्यापिण्याची व्यवस्थीत काळजी घेतल्याचे कथन केलेले आहे. याठिकाणी एक गोष्ट नमूद करणे आवश्यक वाटते की, अर्जदार ही सध्या मुलींसह माहेरी राहत असून जाबदार नं. १ याने अर्जदार करीता अगर मुलींकरीता

उदरनिर्वाहाकरीता शिक्षणाकरीता रक्कम दिल्याचे कोठेही नमूद केलेले नाही अगर अभिलेखावर कोणताही कागद नाही. हेदेखील एकप्रकारचे आर्थीक हिंसाचाराचे कृत्य आहे. अर्जदार हिच्या कथनावरुन प्रथमदर्शनी जाबदार यांनी कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य केल्याचे शाबीत होते. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ करीता होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

<u>**मुद्दा क्रमांक २ करीता–**</u>

११. अर्जदार हिने अंतरिम पोटगी म्हणून रक्कम रुपये ५०,०००/– मिळणेविषयी विनंती केली आहे. अर्जदार हिने कथन केले आहे की, जाबदार नं. १ हा पुणे येथील कंपनीत नोकरीस असून त्यास रक्कम रुपये १,५०,०००/– पेक्षा जास्त पगार आहे. त्यामुळे जाबदार नं. १ यास मागणीप्रमाणे पोटगी देणे शक्य आहे. यातील अर्जदार हिने स्वतःचे मालमत्ता व दायित्व प्रतिज्ञापत्र दाखल केले असून त्यामध्ये तिने तिला सध्या फार्मसी सर्टिफिकेटद्वारे दरमहा रक्कम रुपये ३०००/– मिळत असल्याचे नमूद केलेले आहे. तसेच अभिलेखावर अर्जदार हिने काही मिळकतींचे ७/१२ उतारे दाखल केलेले आहेत. त्यानंतर अर्जदार हिने अभिलेखावर तिला फार्मसी सर्टिफिकेटद्वारे मिळत असलेले उत्पन्न दरम्यानच्या कालावधीत बंद झालेबाबत कागद हजर केलेले आहे. त्याप्रमाणे अर्जदार हि सध्या शाळेमध्ये कामास असून तिला सध्या दरमहा रक्कम रुपये ३०००/– इतके मिळत असलेबाबत शाळेचा दाखला हजर केलेला आहे.

१२. याउलट जाबदार यांनी अर्जदार ही सध्या कामास असुन तिला दरमहा रक्कम रुपये ३०,०००/– उत्पन्न मिळते तसेच अर्जदार हिचे नावे शेतमिळकत असून तिला उत्पन्न मिळते. तसेच अर्जदार ही राहत असलेला बंगला हा देखील दुमजली असल्याचे व अर्जदार हिचे नावे वडिलार्जित शेतमिळकत असून त्यापासून तिला भरघोस उत्पन्न मिळत असल्याचे कथन केलेले आहे. त्याचप्रमाणे जाबदार नं. २ ह्या शारिरीक व्याधींनी त्रस्त असून त्यांच्या औषधोपचाराचा खर्च करावा लागत असल्याचे कथन केलेले आहे. त्याचप्रमाणे जाबदार नं. १ यांनी पुणे येथे फ्लॅट घेतला असून सदर फ्लॅटच्या कर्जाचे हप्ते

जाबदार याला भरावे लागत असून सदर फ्लॅटचा अद्याप ताबा मिळाला नसल्याचे कथन केलेले आहे. त्याचप्रमाणे जाबदार नं. १ यास दरमहा घरभाडे द्यावे लागत असल्याचे व इतर खर्च असल्याचे नमूद केलेले आहे.

१३. यातील जाबदार नं. १ यांनी आपले मालमत्ता व दायित्व प्रतिज्ञापत्र अभिलेखावर दाखल केलेले असून सदरच्या प्रतिज्ञापत्रामध्ये जाबदार नं. १ यांनी त्यांचे शिक्षण बीई (मेकॅनिकल) आणि एमबीए असे नमूद केले असून तो सध्या यानकेंग ॲटोमेटीव्ह लि. पुणे याठिकाणी नोकरीस असून त्यास दरमहा रक्कम रुपये १,१५,०००/– इतका पगार मिळत असल्याचे नमूद केलेले आहे. त्याचप्रमाणे फ्लॅटचे कर्ज रक्कम रुपये ३९ लाख इतके असून त्याचा मासिक हप्ता ३६, १४७/– इतका असल्याचे नमूद केलेले आहे. त्याचप्रमाणे घरभाडे दरमहा रक्कम रुपये १८,०००/– भरावे लागत असल्याचे नमूद केलेले आहे. त्याचप्रमाणे जाबदार यांनी स्वतःची एक कार आणि दोन दुचाकी असल्याचे नमूद केलेले आहे. त्याचप्रमाणे जाबदार यांचे हालोंडी येथे घरमिळकत आणि शेतजमीन मिळकत असल्याचे नमूद केलेले आहे. त्याचप्रमाणे जाबदार यास इन्शुरन्स पॉलीसी करीता दरवर्षी साधारण रक्कम रुपये १७ ते १८ हजार आणि एसआयपी, एनपीएस याकरीता दरमहा रक्कम रुपये साधारण ७ ते ८ हजार भरावे लागत असल्याचे नमूद केलेले आहे. त्याचप्रमाणे जाबदार नं. २ हिच्या औषधोपचाराकरीता दरमहा रक्कम रुपये ५,०००/– इतका खर्च येत असल्याचे नमूद केलेले आहे.

१४. यातील अर्जदार हिने जाबदार नं. १ याचेकडून दरमहा रक्कम रुपये ५०,०००/– इतकी अंतरिम पोटगी स्वतःकरीता आणि मुलींकरीता मागणी केलेली आहे. जाबदारतर्फे वकिलांनी युक्तीवादादरम्यान कथन केले की, अर्जदार हिने दोन्ही मुलींना अर्जाचे कामी पक्षकार केलेले नाही, त्यामुळे अर्जदार हिला मुलींकरीता पोटगी मागण्याचा अधिकार नाही. कौटुंबिक हिंसाचार कायदा कलम २० या कलमाचा विचार करीता अर्जदार ही स्वतःकरीता तसेच मुलांकरीता आर्थीक खर्चाकरीता पोटगी मागू शकते. त्यामुळे सदर

अर्जाचे कामी दोन्ही मुलींना जरी पक्षकार केले नसले तरी अर्जदार ही स्वतःकरीता आणि मुलींकरीता पोटगी मागू शकते. त्याचप्रमाणे जाबदारतर्फे वकिलांनी युक्तीवाद केला की, सदरकामी संरक्षण अधिकारी यांचेकडून कौटुंबिक घटना अहवाल प्राप्त झालेला नाही. त्यामुळे कौटुंबिक घटना अहवाल अभिलेखावर नसल्याने सदरकामी कोणतेही अंतरिम आदेश पारीत करणेस बाधा येते. याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, मा. सर्वोच्च न्यायालय यांचे प्रभा त्यागी वि. कमलेश देवी (२०२२) ८ एससीसी ९० या न्यायनिवाडयामध्ये विषद केलेले आहे की, कौटुंबिक हिंसाचार कायद्याखालील अर्जामध्ये कोणताही आदेश पारीत करतेवेळी कौटुंबिक घटना अहवाल विचारात घेण्याची आवश्यकता नाही. प्रस्तुत प्रकरणामध्ये अद्याप कौटुंबिक घटना अहवाल प्राप्त झालेला नाही. त्यामुळे केवळ कौटुंबिक घटना अहवाल अभिलेखावर नसल्याने कोणतेही अंतरिम आदेश पारीत करता येणार नाही असे म्हणता येणार नाही.

१५. वर नमूद केल्याप्रमाणे यातील जाबदार नं. १ यांनी अर्जदार व तिच्या मुलींकरीता उदरनिर्वाहाकरीता, शिक्षणाकरीता व इतर खर्चाकरीता कोणतीही रक्कम दिली नसल्याचे अभिलेखावरुन दिसून येते. यातील अर्जदार व तिच्या मुलींच्या उदरनिर्वाहाची संपूर्ण जबाबदारी ही जाबदार नं. १ याचेवर असून जाबदार नं. १ याने ती जबाबदारी पार पाडली नसल्याचे दिसून येते. त्यामुळे अर्जदार व तिच्या मुली या जाबदार नं. १ याचेकडून अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहेत. यातील अर्जदार हिने तिला सध्या दरमहा रक्कम रुपये ३०००/– मिळत असलेबाबत कथन केलेले असून त्याअनुषंगाने अभिलेखावर शाळेचा दाखला हजर केलेला आहे. याऊलट अभिलेखावरुन असे दिसून येते की, जाबदार नं. १ हा नोकरीस असून त्यास दरमहा रक्कम रुपये १,१५,०००/– इतका पगार आहे. तसेच जाबदार नं. १ याचा पुण्यामध्ये फ्लॅट, दुचाकी, कार असल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे जाबदार यांचे हालोंडी येथे घरमिळकत व शेतमिळकत असल्याचे दिसून येते. यातील जाबदार यांनी अर्जदार हिला सध्या दरमहा रक्कम रुपये ३०,०००/– मिळत असल्याबाबत कथन केलेले आहे. परंतु केवळ कथनांशिवाय सद्यपरिस्थीतीत कोणताही पुरावा सादर

केलेला नाही. तसेच अर्जदार हिने मिळकतीबाबत ७/१२ उतारे दाखल केलेले आहेत. परंतु सदरच्या मिळकतीमधून अर्जदार हिला उत्पन्न मिळते असे दर्शविणारा कोणताही कागद अभिलेखावर नाही. मा. सर्वोच्च न्यायालय यांनी प्रविणकुमार जैन वि. अंजु जैन (२०२५)२ एससीसी या न्यायनिवाडयामध्ये रजनेश वि. नेहा (२०२१) २ एससीसी ३२४ आणि किरण ज्योत मैनी वि. अनिष प्रमोद पटेल २०२४ एससीसी ऑनलाईन एससी १७२४ या न्यायनिर्णयामध्ये विषद केलेल्या मार्गदर्शक तत्वांच्या आधारावर पोटगीच्या केसचे कामी विचारात घेण्याच्या बाबींबाबत मार्गदर्शक तत्वे विषद केलेली आहेत. सदरच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये पोटगीची रक्कम मंजूर करतेवेळी न्यायालयाने दोन्ही पक्षकारांची सामाजिक आणि आर्थीक स्थिती, पत्नीची आणि तिच्यावर अवलंबून असणा–या मुलांच्या आवश्यक गरजा, प्रत्येक पक्षकाराचा सद्यस्थितीत स्वतंत्ररित्या मिळणारे उत्पन्न, पतीचे आर्थीक क्षमता आणि त्याची पोटगी देण्याची जबाबदारी आणि इतर जबाबदारी दोन्ही पक्षकारांचे सद्याचे राहणीमान इत्यादी बाबी विचारात घेणे आवश्यक असल्याचे विषद केलेले आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये यातील अर्जदार ही सध्या दोन्ही मुलींसह आपल्या माहेरी रहात आहे. यातील जाबदार यांनी अर्जदार हिचे माहेरी बंगला असल्याचे नमूद केलेले आहे. परंतु त्यासंदर्भाने कोणताही कागद अभिलेखावर नाही. त्याचप्रमाणे जाबदार यांना त्यास फ्लॅटच्या कर्जाचे हप्ते, इन्शुरन्स प्रिमियम, घरभाडे आणि आईचा औषधोपचार खर्च असल्याचे कथन केलेले आहे. जाबदार नं. १ याने घेतलेले कर्ज हे फ्लॅटकरीता तसेच दुचाकीकरीता घेतलेले असले तरी त्या त्याच्या स्वतःच्या मालकीच्या वस्तु/मिळकत आहेत व त्याचा उपभोग हा सरतेशेवटी जाबदार हेच घेणार आहेत. तसेच प्रस्तुत प्रकरणातील दोन्ही पक्षकारांना सद्यपरिस्थीतीत मिळणारे उत्पन्न पाहता यातील अर्जदार ही निश्चितच स्वतःकरीता व मुलींकरीता अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहे. यातील जाबदार नं.१ यास मिळणारे उत्पन्न आणि त्याचेवर असणा–या जबाबदा–या यांचा विचार करीता सद्यपरिस्थीतीत अर्जदार व तिच्या मुलींकरीता अंतरिम पोटगी म्हणून दरमहा रक्कम रुपये ३५,०००/– इतकी मंजूर करणे योग्य वाटते. सबब मी मुद्दा क्र. २ करीता अंशतः होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ०३ करीता</u>–**

१६. यातील अर्जदार हिने मुली शामली व अव्यानी हिच्या शिक्षणाची फी व इतर शालेय खर्च, टयुशन फी पोटी प्रतिवर्षी रक्कम रुपये १,००,०००/– मिळणेबाबत विनंती केलेली आहे. याऊलट जाबदार यांनी मुली कोठे शिक्षण घेतात, त्यांची शिक्षण फी किती आहे याबाबत कोणताही कागद अभिलेखावर दाखल केला नसल्याचे कथन केलेले आहे. यातील अर्जदार हिने अभिलेखावर काही शाळेची फी भरल्याची पावती आणि क्लासची फी भरल्याची पावती अभिलेखावर दाखल केलेली आहे. सदरच्या पावत्यांचे अवलोकन केले असता, अर्जदार हिच्या मुलींचा शैक्षणिक फी व खर्च प्रतिवर्षी रक्कम रुपये १,००,०००/– इतका असल्याचे दिसून येत नाही. परंतु अर्जदार हिच्या स्वतःच्या सध्याचा उत्पन्नाचा विचार करीता तसेच जाबदार नं. १ याची मुलींच्या शिक्षणाची जबाबदारी लक्षात घेता सदरकामी मुलींच्या शिक्षणाकरीता प्रतिवर्षी रक्कम देणेबाबत आदेश पारीत करणे योग्य वाटते. यातील अर्जदार हिच्या मुलींच्या वयाचा व शिक्षणाचा विचार करीता जाबदार नं. १ यास मुलींच्या शिक्षणाची फी व खर्चापोटी प्रतिवर्षी रक्कम रुपये ६०,०००/– इतकी देणेबाबत आदेश पारीत करणे योग्य वाटते. तसेच शैक्षणिक वर्षाचा विचार करीता सदरची रक्कम ही प्रतिवर्षी जून महिन्यामध्ये देणेबाबत आदेश करणे योग्य वाटते. सदरकामी अर्जदार हिने जाबदार याचेकडून शैक्षणिक फी मिळणेकरीता स्वतंत्र असा वेगळा अर्ज देखील दाखल केलेला आहे. सदरच्या अर्जास जाबदार यांनी म्हणणे दाखल केलेले नाही अगर शैक्षणिक फीकरीता म्हणून कोणतीही रक्कम दिलेली नाही. त्यामुळे चालू शैक्षणिक वर्षाकरीता म्हणून शैक्षणिक फी व त्या खर्चापोटी रक्कम रुपये ६०,०००/– इतकी प्रस्तुतचा आदेश झालेपासून एक महिन्याच्या आत देणेबाबत आदेश करणे न्यायोचित असे वाटते. सबब मी मुद्दा क्रमांक ३ करीता अंशतः होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ४ करीता</u>–**

१७. यातील अर्जदार हिने निवा–याच्या सोयीसाठी तेवढया जागेची तजवीज म्हणून जाबदार याने घरभाडे व लाईट पाण्यासाठी रक्कम रुपये १०,०००/– दरमहा देणेबाबत

विनंती केली आहे. याऊलट जाबदार यांनी अर्जदार ही सध्या तिच्या माहेरी दुमजली इमारतीत राहणेस असल्याचे कथन केलेले आहे. तसेच जाबदार यांनी पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार ही सध्या कोठेही भाडयाने राहत नाही व त्याअनुषंगाने कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नसल्याने सदरची मागणी मंजूर करण्यात येऊ नये अशी विनंती केली आहे. यातील अर्जदार ही सध्या तिच्या मुलींसह माहेरी रहात असल्याची बाब वादातीत नाही. यातील अर्जदार हिने जाबदार यांचेकडून घरभाडे व लाईट पाणीसाठी रक्कम रुपये १०,०००/– मिळणेविषयी विनंती केलेली आहे. परंतु अर्जदार हिच्या अर्जातील कथनांचा विचार करीता अर्जदार हिने भाडयाने घर किंवा फ्लॅट घेतला आहे किंवा त्याअनुषंगाने कोणतीही कागदपत्रे सादर केलेली नाहीत. त्यामुळे सद्यपरिस्थीतीत सदरची मागणी मान्य करणे योग्य व न्यायोचित नाही. सबब मी मुद्दा क्रमांक ४ करीता नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

<u>मुद्दा क्रमांक ५ करीता</u>–

१८. यातील अर्जदार हिने अंतरिम संरक्षणात्मक आदेश मिळणेबाबत विनंती केलेली आहे. यातील अर्जदार हिच्या कथनांचा विचार करिता, अर्जदार ही माहेरी आलेपासून जाबदार यांनी तिच्या माहेरी येऊन तिला त्रास दिला, तिचा छळ केला तसेच प्रकरण दाखल केल्यानंतर देखील कोणत्याही प्रकारे त्रास देत आहेत असे काठेही कथन नाही. त्यामुळे सद्य परिस्थितीत अर्जदार ही अंतरिम संरक्षणात्मक आदेश मिळणेस पात्र नाही. सबब मी मुद्दा ५ चा नकारार्थी निष्कर्ष नोंदवत आहे.

<u>मुद्दा क्रमांक ६ करीता–</u>

१९. वरील एकंदरीत विवेचनावरुन जाबदार यांनी अर्जदार हिचेवर कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य केल्याची बाब प्रथमदर्शनी शाबीत होते. त्याचप्रमाणे अर्जदार व तिच्या मुली या जाबदार नं. १ याचेकडून उदरनिर्वाहाकरीता म्हणून अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहे. त्याचप्रमाणे अर्जदार हिच्या मुलींच्या शिक्षणाकरीता देखील प्रतिवर्षी शैक्षणिक फी

मिळणेस पात्र आहे. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १ | अर्जदार हिचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो. |
| २ | जाबदार क्र.१ यास अर्जदार आणि मुलींचे पालनपोषण करीता अंतरिम पोटगी म्हणून दरमहा रक्कम रुपये ३५,०००/- प्रस्तुतचा अर्ज दाखल तारखेपासून देणेबाबत आदेश करणेत येतो. |
| ३ | जाबदार क्र. १ याने मुली शामली व अव्यानी यांची शिक्षणाची फी व खर्चापोटी प्रतिवर्षी जुन महिन्यामध्ये एकूण रक्कम रुपये ६०,०००/- देणेबाबत आदेश देणेत येतो. तसेच या वर्षीची शैक्षणिक फी व खर्चापोटी म्हणूनची रक्कम रुपये ६०,०००/- प्रस्तुतचा आदेश झालेपासून एक महिन्याचे आत देणेबाबत आदेश देणेत येतो. |
| ३ | सदर आदेशाची प्रत अर्जदार हिला विनामुल्य देण्यात यावी. |

ANIRUDHA SUNIL RANE
Digitally signed by ANIRUDHA SUNIL RANE

मिरज.
दि.०७.११.२०२५.

(अनिरुध्द एस. राणे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मिरज.